# प्रास्ताविक

31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठीचा हा अहवाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

हा अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 आणि लेखापरीक्षा व लेखा यावरील विनियम, 2020 यांमधील तरतुदींच्या अंतर्गत आहे जो महाराष्ट्र शासनाच्या शासकिय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्र उपक्रमे यांच्या लेखापरीक्षेशी संबंधित आहे. हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अंतर्गत राज्य विधानमंडळासमोर सादर करणे आवश्यक असते.

या अहवालात समाविष्ट असणारी प्रकरणे ही वर्ष 2019-20 ते 2020-21 या कालावधीत लेख्यांची चाचणी-तपासणी करते वेळी लक्षात आलेल्या प्रकरणांपैकी, तसेच आधीच्या वर्षात लक्षात आलेली परंतु मागील लेखापरीक्षा अहवालात परामर्श न घेतलेली प्रकरणे आहेत. वर्ष 2019-20 आणि 2020-21 या कालावधीच्या पुढील कालावधी संबंधित प्रकरणे ही आवश्यक तिथे या अहवालात समाविष्ट केलेली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरुन अनुवादीत; शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.**